# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १७ /०२/२०१८**

**सभा सुचना क्र. १२ सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०१/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/०१/२०१८ रोजीचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (मनिष वर्तक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | महानगरपालिका सर्वसाधारण सभा कामकाज शासकीय पत्रव्यवहार विवरणपत्र |

| अनु. क्र. | सभा दिनांक | कोणत्या विभागाकडून प्राप्त | पत्रातील दिनांक | विषय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७/०२/२०१८ | क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२३५/नवि-२० नगर विकास विभाग, ४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०५/०२/२०१८ | ०५/०२/२०१८ | मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री महोदय यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत. | - |

| | | |
|---|---|---|
| ४. | <u>राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात तातपुरत्या स्वरुपात कामकाज करीत असलेल्या आशा स्वयंसेविकांचे मानधन वाढविणेकरीता मंजूरी मिळणेबाबत.</u> | ठराव / निर्णय :- राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात तात्पुरत्या स्वरुपात कामकाज करीत असलेल्या आशा स्वयंसेविकांचे मानधन वाढविणेकरीता मंजूरी मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत १२८ आशा स्वयंसेविकांपैकी ३ वर्ष पुर्ण झालेल्या ५५ आशा स्वयंसेविकांना माहे सप्टेंबर २०१७ पासून प्रति माहे रु. ३०००/- एवढे मानधन तसेच उर्वरीत नवीन नेमणूक केलेल्या ४५ आशा स्वयंसेविकांना व ग्रामीण भागातून शहरी कार्यक्षेत्रामध्ये वर्ग होणाऱ्या २८ आशा स्वयंसेविकांना प्रति माहे रु. १५००/- एवढे मानधन ३ वर्ष पूर्ण होईपर्यंत व ३ वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रति माहे रु. ३०००/- एवढे मानधनात वाढ करणेबाबत ही सभा मंजुरी देत असुन याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (पुष्पा जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ५. | <u>मा. पोलीस अधिक्षक कार्यालय, पालघर यांनी महापालिका क्षेत्रातील पोलीस स्टेशन (स्मार्ट पोलीसींग) नेटवर्क जोडण्याकरीता व सी.सी.टिव्ही बसविणेकामी ऑप्टीकल फायबर केबल टाकणेस परवानगी देणेबाबत.</u> | <u>ठराव / निर्णय</u> :- वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आली व असे ठरविण्यांत आले की, महापालिका क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस अधिक्षक, पालघर यांनी शहरातील १० पोलीस कार्यालये नेटवर्कव्दारे कनेक्ट करण्यासाठी ४० खड्डे तसेच विविध ठिकाणी १५२ सी.सी.टि.व्ही कॅमेरे बसविण्याकामी व ते जोडण्यास HDD पद्धतीने OFC अंथरण्यासाठी एकुण ४५६ खड्डे मारण्यास प्रस्ताव मे. दिनेश इंजिनिअरींग प्रा. ली. यांच्या मार्फत सादर केला असुन ते या सर्व गोष्टी "ना नफा ना तोटा" या तत्वावर करीत असल्याने मा. सर्वसाधारण सभा दि. २०/१२/२०१२ ठराव ०७ अन्वये निश्चित केलेल्या रस्ता खोदाईच्या दरात संपुर्णपणे सुट देण्यात यावी व त्यांना प्रस्तावाप्रमाणे केबल अंथरण्यास सी.सी.टि.व्ही बसविण्यास परवानगी देण्यात यावी. याबाबत पुढील कार्यवाहीचे अधिकार मा. आयुक्त यांना देण्यात येत आहेत.<br>**अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६. | <u>वसई विरार शहर महानगरपाकि भुयारी गटार योजना STP-२ मुख्य मल: वाहिनीच्या इमारतीच्या मुख्य मल: वाहिनीला जोडणे करणे कामीच्या खर्चास</u> | प्रस्तावाचा निर्णय :- सदर विषयाची अधिक माहिती सर्व सदस्यांना प्राप्त न झाल्याने सदरचा विषय तुर्तास तहकुब ठेवावा अशी आजची सर्वसाधारण सभा ठरवित आहे.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| | मान्यता देणे व खर्चाची वसुली लाभार्थ्याकडून करणे कामी अतिरीक्त अर्थसंकल्पीय तरतुद करणे. | |
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्राती १३८ उद्याने व नव्याने तयार होणारे उद्याने सुशोभिकरण करणे कामी लाल माती पुरविणे व पसरविणे, शोभिवंत रोपे व हिरवळ (लॉन) पुरविणे/ लावणे, ३ वर्षे निगा राखणे वगैरे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणे बाबत. | ठराव /निर्णय :- सदर विषयाबाबत सभेमधे सविस्तर चर्चा करणेत आली. सन २०१८-१९, २०१९-२० व २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता ९ प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील अस्तित्वात असलेली एकूण १३८ उद्याने व नव्याने तयार करणेत येणारी उद्याने सुशोभिकरण करणेकामी लाल माती व शेणखत पुरविणे व पसरविणे, शोभिवंत रोपे व हिरवळ (लॉन) पुरविणे व लावणे व ३ वर्षे निगा राखणे करिता बी-२ पद्धतीने प्रभाग समिती निहाय दर मागवून मंजूर होणाऱ्या दरानुसार उद्याननिहाय स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करुन त्यास वेळोवेळी मा. स्थायी समितीची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करणेस ही सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध दुभाजकामध्ये लागवड केलेली शोभिवंत झाडे संगोपन व देखभाल करणे, नव्याने तयार करण्यात येणारे दुभाजकामध्ये शोभिवंत झाडे लागवड करुन संगोपन व देखभाल करणे तसेच सुशोभित न केलेले दुभाजकामध्ये शोभिवंत झाडे लागवड करुन संगोपन व देखभाल करणे या सर्व बाबींसाठी ३ वर्षे कालावधी करीता दैनंदिन देखभाल करणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत. | ठराव :- उपरोक्त प्रस्तावावर सभेमधे सविस्तर चर्चा करणेत आली. चर्चेनुसार सन २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ या त्रैवार्षिक कालावधीकरिता दुभाजकामधे अस्तित्वात असलेली शोभिवंत झुडुपे, बुशेश व शोभिवंत वृक्ष यांचे तीन वर्ष कालावधीकरिता देखभाल व संगोपन करणे, शहरात नव्याने तयार करण्यात येणाऱ्या दुभाजकामध्ये शेणखत, माती, नवीन शोभिवंत वृक्ष लागवड करणे व तीन वर्ष कालावधीकरिता देखभाल व संगोपन करणे, शहरात सुशोभित न केलेली दुभाजकामध्ये शेणखत, माती, नवीन शोभिवंत वृक्ष लागवड करणे व ३ वर्षाकरिता देखभाल व संगोपन करणेकामी बी-२ पद्धतीने प्रभाग समिती निहाय निविदा मागवून प्राप्त होणाऱ्या मंजूर दरानुसार स्वतंत्र अंदाजपत्रक प्रभाग समिती नुसार तयार करुन मा. स्थायी समितीची वेळोवेळी मान्यता घेणेत यावी यास ही सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| ९. | महानगरपालिका मुख्यालयातील दैनंदिन सुरक्षा, प्रभाग समिती कार्यालयाचे, तुळींज व वसई येथील रुग्णालये, स्विमिंग पूल इ.ठिकाणांच्या सुरक्षेसाठी सुरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा यांचेकडून सुरक्षा रक्षक घेण्याबाबत. | ठराव/निर्णय :- प्रशासनाने उपरोक्त सादर केलेल्या प्रस्तावावर विचारविनिमय करुन आजची ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडील सूरक्षा रक्षकाचा सध्याचा मासिक दर सर्वसाधारणपणे रु. २०,०००/- (अधिक १८ % जी.एस.टी.) इतका आहे. तर सूरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा यांचेकडील सूरक्षा रक्षकाचा दर रु. १८,२५०/- (अधिक १८ % जी.एस.टी.) इतका आहे. महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळाकडील सूरक्षा रक्षकांची सेवा उत्तम असून सेवेचा दर्जा चांगला आहे. सदर बाब विचारात घेता प्रस्तावित ६० सूरक्षा रक्षक हे सूरक्षा रक्षक मंडळ, सानपाडा, यांचेऐवजी महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळ या राज्य शासनाच्या वैधानिक महामंडळाकडून घ्यावेत, अशी शिफारस ही सभा करीत आहे. यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळाकडून सूरक्षा रक्षक आल्यानंतर Sainik Intelligence and security Pvt. Ltd. यांचेकडील सूरक्षा रक्षक कमी करण्यांत यावेत. भविष्यात अतिरिक्त सूरक्षा रक्षक घ्यावयाचे असल्यास ते महाराष्ट्र राज्य सूरक्षा महामंडळ यांचेकडून घेण्यास व त्याची मासिक देयके अदा करण्यासदेखील आजची ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १०. | दिनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत स्थापन करणेंत आलेल्या शहरी उपजिविका केंद्र (CLC) मा. धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी करण्याच्या अनुषंगाने कार्यकारी समिती करीता मनपा मा.महासभेने निवडलेल्या एका प्रतिनिधीचे नांव सुचित करणेबाबत. | ठराव :- वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन केंद्र शासन पुरस्कृत दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियाना अंतर्गत स्थापना करण्यात आलेल्या शहरी उपजिविका केंद्र (CLC) च्या प्रस्तावित कार्यकारी समितीवर महानगरपालिकेचे सदस्य श्री. कन्हैय्या (बेटा) मनोहर भोईर यांचे नाव याद्वारे सूचित करण्यास आजची सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (लॉरेल डायस) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ११. | जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर महापालिका प्रवर्गातून एका सदस्याचे नामनिर्देशन करणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- प्रस्तावित केल्यानुसार पालघर जिल्हयातील ग्राहकांच्या तक्रारींच्या निवारणासाठी स्थापन करण्यात आलेल्या पालघर जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील प्रलंबित/रिक्त असलेल्या जागेवर वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे, पालिका सदस्य ॲड. श्रीमती अंजली रामचंद्र पाटील यांची नेमणूक करणेस आजची सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक :- (अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| १२. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमाचे कलम १५८ (१) अन्वये कार्यवाही करणे बाबत दिलेला मंजूर शासन निर्णय | ठराव/निर्णय :-महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ५२ क नुसार अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार लावून "प्रशमित संरचना" म्हणून घोषित करण्यासाठी अधिनियमांचे कलम १५८(१) अन्वये केलेले नियम अंमलबजावणी करणेसाठी दि.१७/०२/२०१८ पासून करणेस खालील प्रमाणे पुढील कार्यवाही करणेस मान्यता देत आहे.<br>१. दि.३१/१२/२०१५ पूर्वीची पूर्ण झालेली अनधिकृत बांधकामे नियमीत करताना घ्यावयाचे प्रशमन आकार (Compounding Charges) विकास आकाराच्या (Development Charges) दुप्पट आकारण्यात यावे.<br>२. शासनाचे धोरणानुसार वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन जनजागृती केल्यानंतर / सर्व संबधितांना जाहिर सूचना दिल्यानंतर सदर अनधिकृत बांधकामे नियमित करताना अर्ज मागविण्याचा कालावधी जाहीर सूचना प्रसिध्द झाले दिनांकापासून एक वर्ष इतका निश्चित करणेत येत आहे.<br>३. शासन निर्णयानुसार दि.३१/१२/२०१५ पूर्वीची पूर्ण झालेली अनधिकृत बांधकामे नियमीत करताना सदर बांधकामे दि.३१/१२/२०१५ पूर्वीचे असल्याबाबत घरपट्टी लावली आहे अगर कसे अथवा जर एखादया बांधकामास घरपट्टी लावली गेली नसल्यास अन्य शासकिय दाखले /पत्र ज्यामध्ये सदर अनधिकृत बांधकामाचा पत्ता नमुद असेल असे (उदा. वीजेचे बील, मतदान ओळखपत्र, आधार कार्ड सदरचे अनधिकृत बांधकामाचे अनुषंगाने झालेला शासकिय/निमशासकिय कार्यालयाचा अथवा उचित प्राधिकरणांचा पत्रव्यवहाराचे दस्त तसेच सार्वत्रिक निवडणूकीकरिता मतदान करणेसाठी निवडणूक आयोगाने अनुज्ञेय केलेल्या यादीतील पुरावे इ.) कागदपत्रे सादर करुन महानगरपालिकेच्या कर विभागाकडून प्रमाणित करुन घेणेत यावे असे नसल्यास सदर अनधिकृत बांधकाम दि.३१/१२/२०१५ नंतरचे असल्याचे कर विभागाने प्रमाणित करावे.<br>४. ज्या प्रकरणामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार अधिकृत बांधकामाबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे अथवा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे अथवा न्यायालयात प्रकरण दाखल झालेले आहे व जे अनधिकृत बांधकाम या धोरणामुळे नियमीत झालेले आहे त्या प्रकरणाबाबतची अनधिकृत बांधकामा बाबतची कार्यवाही थांबून पोलीस स्टेशन व न्यायालयात कळवून गुन्हे / दावे निकाली काढण्यांत यावेत.<br>५. दि.३१/१२/२०१५ नंतरची अनधिकृत बांधकामे नियमीत करण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२९ अन्वये दि.२०/०२/२०१७ रोजी मंजूर केलेल्या धोरणानुसार अथवा त्यामध्ये महानगरपालिकेने वेळोवेळी केलेले बदल /दुरुस्ती नुसार अमलात आणावेत /कार्यवाही करावी.<br>६. शासन निर्णयातील Section १४ प्रमाणे आलेल्या आकारणीचे (Charges) वेगळे खाते(Account) काढून सदर रक्कम लोकांच्या पायाभूत सुविधेसाठी वापरण्यांत यावी.<br>७. जी अनधिकृत बांधकामे दि.३१/१२/२०१५ पूर्वीची असून उचित प्राधिकरणाकडे अपीलासाठी दाखल झालेली आहेत/होती, अशा प्रकरणांचा अनधिकृत बांधकामे नियमित करणेचा प्रस्ताव सादर झाल्यास शासनाच्या धोरणानुसार नियमित करावे. |

८. ज्या प्रकरणामध्ये दि.३१/१२/२०१५ पूर्वी अनधिकृत किंवा नियमबाहय बांधकाम झालेले आहे आणि सदर प्रस्ताव नियमित करण्यासाठी महानगरपालिकेकडे यापूर्वीच सादर केलेले आहेत, असे प्रस्ताव शासनाच्या धोरणानुसार नियमित करण्यांत यावेत त्यासाठी पुन्हा अनधिकृत बांधकाम नियमित करणेसाठी नविन अर्ज मागणीची आवश्यकता नाही.

९. अशा प्रकारे दि.३१/१२/२०१५ पूर्वी झालेल्या अनधिकृत बांधकामाचे प्रस्ताव नियमित करताना सदर बाबत प्रस्ताव निहाय वेळोवेळी सदर शासन निर्णयानुसार छाननी / कार्यवाही करुन ते नियमित होणेसारखे असल्यास ते नियमित करावेत.

१०. शासनाच्या दि.७/१०/२०१७च्या दि.३१/१२/२०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकामे नियमीत करण्याचा शासन निर्णया सोबत जोडलेल्या तक्त्या मधील अनुक्रमांक ५ मध्ये इमारतीची उंची व DR/TDR सह त्यावेळेचे (अनधिकृत बांधकाम केले त्यावेळी) अनुज्ञेय जास्तीत जास्त (Maximum) चटई क्षेत्र निर्देशांक(F.S.I) वापरण्याचे त्या वेळच्या मंजूर DCRमधील तरतुदींच्या तसेच इमारतीच्या वापराच्या अनुषंगाने सदर ठिकाणी आवश्यक असलेल्या रस्त्याच्या रुंदी पेक्षा प्रत्यक्ष जागेवर अथवा D.P मध्ये कमी रुंदीचा पोच रस्ता असल्यास अशा प्रकरणामध्ये अनधिकृत बांधकाम नियमीत करताना अनधिकृत बांधकाम नियमीत करणेचे क्षेत्रावर सदर शासन निर्णयामध्ये नमूद नुसार जादा कंपाऊंडींग चार्जेस जमीनीच्या Ready Reckoner रेटच्या १०% एवढा घेणेचे नमुद आहे. त्याअनुषंगाने अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे या दि.०७/१०/२०१७चे शासन निर्देशा नुसार नियमित करण्यांत यावीत.

११. अनधिकृत बांधकाम नियमीत करणेचे शासनाचे दि.०७/१०/२०१७ चे शासन निर्णयामध्ये निवासी क्षेत्रातील, वाणिज्य क्षेत्रातील, सार्वजनिक व निमसार्वजनिक क्षेत्र, औदयोगिक क्षेत्र या झोनसाठी लागु असल्याचे नमुद केलेले आहे. मात्र वसई विरार उपप्रदेशाचे मंजूर विकास आराखडयात या नमूद झोन व्यतिरिक्त Low Density Residential Zone, Green Zone, Plantation Zone, Cattle Shed Zone हे झोन सुध्दा आहेत व त्यामध्ये दि.३१/१२/२०१५ पूर्वी झालेली अनधिकृत बांधकामे नियमीत करणे बाबतचे शासनाचे धोरणानुसार आवश्यक असल्याने याकामी शासनाकडून मार्गदर्शन घेऊन त्याबाबत कार्यवाही करावी अथवा वसई विरार शहर महानगरपालिकेने मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२९ अन्वये दि.२०/०२/२०१७ रोजी मंजूर केलेल्या धोरणानुसार सदर क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमीत करता येतील अथवा कसे याबाबतही शासनाकडून मार्गदर्शन घेणेत यावे.

१२. वर नमूद मंजूर धोरणा नुसार दि.३१/१२/२०१५ पूर्वीची अनधिकृत बांधकाम/जादा केलेली बांधकामे नियमित करणेस ही सभा मान्यता देत आहे.

१३. तसेच या कामी येणारे खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**१३.** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ नुसार सन २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठी कर व दर निश्चित करणे.**

**ठराव /निर्णय :-** कर व कराच्या प्रशानाच्या प्रस्तावावर चर्चा झाली प्रचलित कर व दर, प्रशासनाने सन २०१८-१९ साठी प्रस्तावित केलेले कर व दर तसेच कर व दर लागू करण्याबाबत मा. स्थायी समितीने दि. ०९ फेब्रुवारी, २०१८ च्या सभेत ठराव क्र. ५१२ अन्वये केलेली शिफारस विचारात घेऊन सन २०१८-१९ साठी खालील कर व दर लागू करावेत, असा निर्णय ही महासभा घेत आहे.

| अ.क्र. | कर/दराचे नांव | महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट भूतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्रातील ३१ मार्च २०१२ पूर्वीच्या मालमत्ता | महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ठ भूतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्रातील १ एप्रिल २०१२ नंतर अस्तित्वात असलेल्या मालमत्ता | भूतपुर्व वसई-विरार नालासोपारा, नवघर, माणिकपुर नगरपरिषद विभाग | सन २०१८-१९ साठी प्रस्तावीत दर | मा.महासभेची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकत्रित मालमत्ता कर | ० | **ब)** महानगरपालिकेत समावेश झालेल्या जिल्हापरिषद क्षेत्रातील मालमत्तेचे कर योग्य मुल्य निश्चित करुन होणा-या सामान्य कराच्या रक्कमेच्या ४०% रक्कम किंवा जिल्हा परिषद क्षेत्रातील सद्याचे देय कराची रक्कम या दोहोपैकी जी अधिक असेल ती रक्कम | **अ)** करयोग्य मुल्याच्या ३०% | अ) करयोग्य मूल्याच्या ३२% ब) भूतपुर्व जिल्हापरिषद क्षेत्रातील मालमत्तांचे करयोग्य मूल्य निश्चित करुन होणा-या सामान्य कराच्या रक्कमेच्या ६०% | **अ)** करयोग्य मुल्याच्या ३०% ब) भूतपुर्व जिल्हापरिषद क्षेत्रातील मालमत्तांचे करयोग्य मूल्य निश्चित करुन होणा-या सामान्य कराच्या रक्कमेच्या ६०% |
| | घरपट्टी | रु. ०.१० ते ४.०० प्रती चौ.फुट प्रमाणे चटई क्षेत्रावर | - | - | विशेष पाणीपट्टी स्वतंत्रपणे आकारणी केली जात असून याव्दारे एकत्रित मालमत्ता कर आकारणी प्रस्तावीत केली असल्याने घरपट्टी, दिवाबत्ती, सामान्य आरोग्य रक्षण कर | - |
| | दिवाबत्ती | निवासी वापर रु. १० ते २० व्यावसायिक वापर रु. २० ते ५० | - | - | | - |
| | सामान्य आरोग्य रक्षण कर | निवासी वापर रु. १० ते २५ व्यावसायिक वापर रु. २० ते ५० | - | - | व सामान्य पाणीपट्टी या कराचा भाग एकत्रित मालमत्ता करात समाविष्ट आहे. | - |
| | सामान्य पाणीपट्टी | सार्वजनिक मासिक रु. २५/- खाजगी | - | - | | - |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मासिक रु. ३०/- | | | | |
| | | २ | नाटयगृहावरील कर (शो टॅक्स) | रु. १५/- प्रति खेळ | रु. १५/- प्रती खेळ | रु. १५/- प्रती खेळ | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी रु. १००/- प्रती खेळ | - |
| | | ३ | वृक्ष कर | ० | १% | १% | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी करयोग्य मूल्याच्या १% | - |
| | | ४ | विशेष स्वच्छता कर | | | | | |
| | | | १) झोपडी | - | - | - | - | - |
| | | | २) इमारती मधील सदनिका | - | रु.१८०/- | रु. १८०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती सदनिका रु. २५०/- | - |
| | | | ३) हॉटेल | - | रु. ५००/- | रु. ५००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती हॉटेल रु. ८००/- | - |
| | | | ४) दुकान | - | रु. ३६०/- | रु. ३६०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती दुकान रु. ५००/- | - |
| | | | ५) स्वतंत्र घर | - | रु. ३००/- | रु. ३००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती घर रु. ४००/- | - |
| | | | ६) बंगला | - | रु. ३००/- | रु. ३००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती बंगला रु. ४००/- | - |
| | | | ७) चाळीतील खोली | - | रु. १८०/- | रु. १८०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती खोली रु. २००/- | - |
| | | ५ | अग्निशमन कर | | | | | |
| | | | १) झोपडी | - | रु. १५/- | रु. १५/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती झोपडी रु. २५/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती झोपडी रु. २५/- |
| | | | २) इमारती मधील सदनिका | - | रु. २५/- | रु. २५/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती सदनिका रु. ५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती सदनिका रु. ५०/- |
| | | | ३) स्वतंत्र घर | - | रु. ४०/- | रु. ४०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती घर रु. ८०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती घर रु. ८०/- |
| | | | ४) बंगला | - | रु. ५०/- | रु. ५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती बंगला रु. १००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती बंगला रु. १००/- |
| | | | ५) चाळीतील खोली | - | रु. २०/- | रु. २०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती खोली रु. ४०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती खोली रु. ४०/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ ते २०० चौ.फुटापर्यंत अनिवासी वापरासाठी | - | रु. १००/- | रु. १००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. १५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. १५०/- |
| | | | २०१ ते ५०० चौ.फुटा पर्यंत अनिवासी वापरासाठी | - | रु. १५०/- | रु. १५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. २००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. २००/- |
| | | | ५०१ ते १००० चौ.फुटा पर्यंत अनिवासी वापरासाठी | - | रु. २००/- | रु. २००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. २५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. २५०/- |
| | | | १००१ चौ.फुटाहुन अधिक अनिवासी वापरासाठी | - | रु. २५०/- | रु. २५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. ५००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती इमारत रु. ५००/- |
| | | | ६) हॉटेल बार & रेस्टॉरन्ट अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती हॉटेल बार & रेस्टॉरन्ट रु. १०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती हॉटेल बार & रेस्टॉरन्ट रु. १०००/- |
| | | | ७) चित्रपट गृह अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती चित्रपट गृह रु. १०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती चित्रपट गृह रु. १०००/- |
| | | | ८) १ ते २०० चौ.फुटापर्यंत कारखाने अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १०००/- |
| | | | २०१ ते ५०० चौ.फुटा पर्यंत कारखाने अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १०००/- |
| | | | ५०१ ते १००० चौ.फुटा पर्यंत कारखाने अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १५००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १५००/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १००१ ते १५०० चौ.फुटा पर्यंत कारखाने अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १७५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. १७५०/- |
| | | | १५०१ ते २००० चौ.फुटा पर्यंत कारखाने अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. २०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. २०००/- |
| | | | २००१ ते ५००० चौ.फुटा पर्यंत कारखाने अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. ५०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. ५०००/- |
| | | | ५००१ चौ.फुटाहुन अधिक कारखाने अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. ८०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती कारखाने रु. ८०००/- |
| | | | ९) १ ते २०० चौ.फुटापर्यंत गोदामे अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. १०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. १०००/- |
| | | | २०१ ते ५०० चौ.फुटा पर्यंत गोदामे अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. १०५०/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. १०५०/- |
| | | | ५०१ ते १००० चौ.फुटा पर्यंत गोदामे अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. १५००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. १५००/- |
| | | | १००१ ते १५०० चौ.फुटा पर्यंत | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गोदामे अनिवासी वापरासाठी | | | | रु. १७५०/- | १७५०/- |
| | | | १५०१ ते २००० चौ.फुटा पर्यंत गोदामे अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. २०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. २०००/- |
| | | | २००१ ते ५००० चौ.फुटा पर्यंत गोदामे अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. ५०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. ५०००/- |
| | | | ५००१ चौ.फुटाहुन अधिक गोदामे अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. ८०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती गोदामे रु. ८०००/- |
| | | | १०) २००० चौ.फुटा पेक्षा मोठे तबेले अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती तबेला रु. ५००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती तबेला रु. ५००/- |
| | | | ३००१ ते ५००० चौ.फुटा (प्रति शेड) पर्यंत तबेले अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती तबेला रु. १०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती तबेला रु. १०००/- |
| | | | ५००० चौ.फुटा (प्रति शेड) पेक्षा मोठे तबेले अनिवासी वापरासाठी | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती तबेला रु. २०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती तबेला रु. २०००/- |
| | | | ११) वखार | - | - | - | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती वखार रु. १०००/- | संपूर्ण महानगरपालिका क्षेत्रासाठी प्रती वखार रु. १०००/- |
| | | ६ | शासनाचा शिक्षण कर | ० | शासकीय नियमानुसार व वर्गवारीनुसार निवासी वापर २ ते ६% | शासकीय नियमानुसार व वर्गवारीनुसार | शासकीय नियमानुसार | शासकीय नियमानुसार |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | व्यावसायिक वापर ४ ते १२% | निवासी वापर २ ते ६ % व्यावसायिक वापर ४ ते १२ % | | |
| | | ७ | शासनाचा रोजगार हमीउपकर | ० | शासकीय नियमानुसार व वर्गवारीनुसार १ ते ३% व्यावसायिक वापर | शासकीय नियमानुसार व वर्गवारीनुसार १ ते ३% व्यावसायिक वापर | शासकीय नियमानुसार | शासकीय नियमानुसार |
| | | ८ | स्थानिक संस्था कर | ० | सन २०१५-१६ मधील प्रचलित दर सोबतचे विवरणपत्रानुसार आहेत | सन २०१५-१६ मधील प्रचलित दर सोबतचे विवरणपत्रानुसार आहेत | सन २०१६-१७ चे प्रचलित दर सन २०१७-१८ मध्ये विनाफेर फार लागु असतील | शासकीय नियमानुसार |
| | | ९ | विशेष पाणीपट्टी | ० | सन २०१५-१६ मधील प्रचलित दर सोबतचे विवरणपत्रानुसार आहेत | सन २०१५-१६ मधील प्रचलित दर सोबतचे विवरणपत्रानुसार आहेत | सन २०१६-१७ चे प्रचलित दर सन २०१७-१८ मध्ये विनाफेर फार लागु असतील | शासकीय नियमानुसार |
| | | अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर | | | | | | |

नगरसचिव

वसई विरार शहर महानगरपालिका